**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**या कार्यालायातील वापराकरिता प्लॅस्टिक व कापडी बस्ते**
**पुरविण्याकरिता ठेकेदार नियुक्त करण्याबाबत....**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय या कार्यालयातील विविध कक्षाकडील महत्वाचे अभिलेख, नस्त्या तसेच इतर महत्वाचे साहित्य जतन करण्यासाठी १६"x१६"x १३.५०" व यापेक्षा मोठे प्लॅस्टिक बस्ते तसेच विधानमंडळ सचिवालयातील विविध समिती कक्ष यांचे कार्यालयीन वापराकरिता १६"x१६" x १०"x८" या दोन वेगवेगळया आकारमानाचे कापडी बस्ते खरेदीकरिता पुरवठादार/ ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर कामाकरिता इच्छुक पुरवठादार/ ठेकेदारांनी आपले दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**